सन २०१७-१८ च्या टंचाई अंतर्गत गांधीनगर व १३ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता. करवीर, जि.कोल्हापूर या योजनेच्या विशेष दुरुस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१७/प्र.क्र. ४७/पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०९ मे, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६
३) विभागीय आयुक्त, पुणे यांचे क्रमांक जा.क्र. विकास/कार्यासन-५/कावि-४२/२०१८, दिनांक ०३.०३.२०१८ चे पत्र.
४) शासन पत्र क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र. १७० /पापु १४, दिनांक १५.०३.२०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ०३.०३.२०१८ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी गांधीनगर व १३ गांवे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता. करवीर, जि.कोल्हापूर या योजनेतील दाबनलिका व गुरुत्ववाहिनी व इतर कामांचा समावेश असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी करिता शासनास सादर केला आहे.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक १४.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत या योजनेच्या क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई नसल्याने टंचाई अंतर्गत धोरणानुसार मंजूरी देता येत नसल्याने तसेच अन्य कोणत्याही

योजनेतून इतक्या मोठया प्रमाणावर दुरुस्ती शक्य नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांना मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. मा. मुख्यमंत्री महोदयांनी एक विशेष बाब म्हणून सदर प्रस्ताव टंचाई अंतर्गत उपाययोजनेतून घेण्यास मंजूरी दिली आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिल्यानुसार योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन व ९ % ऐवजी ४ % ईटीपी चार्जेस अनुज्ञेय करुन गांधीनगर व १३ गांवे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता. करवीर, जि. कोल्हापूर या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्ती या टंचाई उपाययोजनेतंर्गत परिशिष्टात नमुद कामांचा समावेश असलेल्या रुपये १०५२.५२ (रुपये दहा कोटी, बावन्न लाख, बावन्न हजार फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर प्रस्तावनेत नमूद केलेली सर्व विशेष दुरुस्तीची कामे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर यांचेमार्फत करण्यात यावीत.

२) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. जादा किंमतीच्या निविदा स्वीकृत करु नयेत.

३) निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर करार पत्रातील अटी व शर्तीनुसार दिलेल्या मुदतीतच योजना पुर्ण होणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही.

४) योजनेचे काम प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. त्यापेक्षा जास्त खर्च केल्यास त्याकरिता शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. योजनेची किंमत वाढल्यास त्याची शासनस्तरावरुन गंभीर दखल घेऊन संबंधितांवर शिस्तभंग कार्यवाही करण्यात येईल.

५) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांच्या दि.०३.०२.२०१८ च्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींचे पालन व पुर्तता करावी.

६) योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास त्यास जबाबदार संबंधित अधिकारी / कर्मचारी शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील.

७) विभागीय आयुक्त, पुणे यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

८) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा

प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य) (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती या टंचाई उपाययोजने अंतर्गत एक विशेष बाब म्हणून मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०७१२२१२०७६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2018.05.09 11:06:26 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, पुणे

९. जिल्हाधिकारी, कोल्हापूर
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
११. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे
१२. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली
१३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर
१४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर
१५. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१७. पापु १४ (निवडनस्ती)

परिशिष्ट

गांधीनगर व १३ गांवे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता. करवीर, जि.कोल्हापूर या योजनेतील खालीलप्रमाणे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

Sr. No.	Sub Works	Estimated Cost
1	Replacement of Raw water and Pure water Gravity Mains	8,39,16,700.00
2	Repairs to existing WTP cap 15 MLD	46,73,954.00
3	Misc Works	72,30,000.00
4	Repairs to existing RCC ESR’s	4,93,525.00
5	Replacement of R.W. and P.W. Pumping Machinery	48,90,245.00
	Total	**10,12,04,424.00**
	ETP Charges 4 %	40,48,177.00
	Total	**10,52,52,600.00**
	Say	**Rs.1052.52 Lakhs**

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2018.05.09 11:07:00 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन